Vol 4 Issue 2 Aug 2014 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2231-5063

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-4 | Issue-2 | Aug-2014
Available online at www.aygrt.isrj.net

# बेंबळा खो–यामधील यात्रा–व्यापार केंद्रांच्या उत्पत्ती अवस्थांचे वितरण व संकल्पना

**Vijay K. Tompe**

Asst. Prof & Head, Dept. of Geography, G.S.Tompe Arts, Commerce & Science College,
Chandur Bazar Dist. Amravati (M.S.)

***सारांश :-***प्राचीन काळापासून यात्राचा विकास किंवा उत्पत्ती झाली पण तो विकास हा देवाणघेवाणीतून झाला आहे. यात्रेची उत्पत्ती करीता व्यापार हा घटक महत्वाचा आहे त्यादृष्टीकोनातून व्यापार केंद्राच्या विनीयोग पध्दतीच्या वापराव्दारे यात्रा केंद्र विकसीत होऊ शकते असे हॉडर यांनी 1965 मध्ये मांडले. बेंबळा खो–यातील यात्रा व्यापार केंद्रांच्या उत्पत्तीला प्राचीन इतिहास असून काही धार्मिक व प्राकृतिक वैशिष्टयांचा आधार घेऊन खो–यात 107 यात्रा व्यापार केद्रांपैकी 98 यात्रा व्यापार केंद्रे विकसीत झाली त्यातील काही विकसीत तर काही अविकसीत स्वरुपाचे आहेत. दिवसेंदिवस 98 यात्रा व्यापार केंद्रावरील परिणाम करणा–या घटकांवर विशेष लक्ष दिले तर या अविकसीत यात्रा विकसीत होऊ शकते.

***बीज संज्ञा :*** विनीयोग, यात्रासदृष्य, दप्तरी व सालई.

## *प्रस्तावना :-*

प्राचीन काळापासून भारतात विविध ठिकाणांवर यात्रा भरत आहेत. भारत हा उत्सवप्रिय देश असल्यामुळे यात्रेला भारतीय संस्कृतीत अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे. हिंदु धर्मात विविध देवदेवतांशी संबंधीत यात्रा पवित्र मानल्या जाते. आजही एकविसाव्या शतकात यात्रेला सामाजिक जिवनात अत्यंत महत्व प्राप्त झालेले आहे. यात्रा ग्रामीण भारतीयांच्या जिवनाचा अविभाज्य अंग मानल्या जातो. साधारणपणे पौर्णिमा व अमावस्येला भरणा–या यात्रेची संख्या जास्त आहे. महाभारतापूर्वी यात्रा करणे धार्मिक जीववनात अत्यंत महत्वाचे मानले जात होते. रामायणात सुध्दा लक्ष्मणाने यात्रा करुनच मोक्ष प्राप्ती केल्याचा उल्लेख आढळतो. यात्रा व्यापाराचा इतिहास पाहील्यास याची साक्ष व पूरावे आपल्याला इतिहासाच्या विविध साधनामधुन मिळतात. प्राचीन भारतीय काळापासून यात्रेचे अनेक संदर्भ मिळतात. भारताची आर्थिक संपन्नता व जागतिक आर्थिक महत्व ज्या विविध बाबीमुळे वाढले त्यात यात्रा व्यापाराला अत्यंत महत्व आहे. यात्रेमुळे देशांची संपन्नता व नावलौकीक जगभर पसरलेले आहे. त्याकरीता यात्रेच्या उत्पत्ती विषयी माहिती पाहणे तेवढेच आवश्यक आहे.

***उत्पत्ती स्थितीचा सिंध्दात :*** यात्रेची उत्पत्ती होण्याकरीता व्यापार अत्यंत महत्वाचा घटक आहे. याच दृष्टीकोनातून व्यापार केंद्राच्या विनीयोग पध्दतीच्या मूळ कल्पनेवर प्रकाश टाकणे आवश्यक आहे त्याकरीता उत्पत्ती स्थितीचा सिध्दांत पाहणे आवश्यक आहे. यामध्ये 2 सिध्दांत मांडण्यात आले.

**1) Orthodox & Endogeneous Theory:** या सिध्दांतामध्ये सहज प्रवृत्तीमधून करण्यात येणा–या विनियोगापासून वस्तुंची अदलाबदली करणे मांडले आहे. यामध्ये वैयक्तिक गरजेतूनच उपयुक्त वस्तुंच्या विनिमय करणे आवश्यक गोष्ट आहे.हा सिध्दात रुढीवादी व प्रचलीत पध्दतीवर अवलंबुन आहे, यामध्ये वैयक्तिक मालमत्तेची निशब्द अदलाबदल करणे व तीला स्थानिक विनियोगाच्या गरजेपासून रोखणे. (Barter Exchange System – Hodder, 1965)

**2) Exogeneous Theory:** हा सिध्दांत विकल्प पध्दतीवर आधारीत आहे त्यानुसार एकमेकांना लागु असलेल्या व्यापारी स्थळांमध्ये व्यवसायाचा प्रश्न निर्माण होत नाही. ही दोन्ही व्यापार केंद्र स्वयंपूर्ण असतात. यामध्ये व्यवसाय हा विविध जाती जमातीमधील देवाणघेवाण होय.

***अभ्यास क्षेत्र :***

बेंबळा नदीचे खोरे हे विदर्भाच्या साधारणपणे मध्य भागात स्थिरावले आहे. यामध्ये पश्चिम विदर्भातील अमरावती, यवतमाळ व वाशिम जिल्हयातील समाविष्ट होत असलेल्या 9 तालुक्यांचा समावेश होतो. यामध्ये अमरावती जिल्हयातील अमरावती, तिवसा, चांदूररेल्वे व नांदगाव खंडेश्वर तर यवतमाळ जिल्हयामध्ये यवतमाळ, नेरपरसोपंत, बाभूळगाव व कळंब आणि वाशिम जिल्हयातील कारंजा या तहसिलचा समावेश होतो. या खो–याचा अक्षवृत्तीय विस्तार 200 23' 20'' उत्तर ते 200 54' 5'' अक्षवृत्त असून रेखावृत्तीय विस्तार 770 26' 40'' पूर्व ते 780 16' 40'' पूर्व रेखावृत्ताच्या दरम्यान पसरलेला आहे. खो–याचे एकूण क्षेत्रफळ 3081.15 चौ.कि.मी. असून उत्तर दक्षिण लांबी 64.25 कि.मी. आहे तर रुंदी 83.75 कि.मी. आहे.

**बेंबळा खोरे - स्थान व विस्तार**




***अभ्यासाची उद्दिष्टये :*** प्रस्तुत शोध निबंधात पुढील उद्दिष्टये विचारात घेऊन अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

1) बेंबळा खो–यातील यात्रा व्यापार केंद्राच्या उत्पत्तीच्या वितरणाचा अभ्यास करणे.
2) बेंबळा खो–यातील यात्रासदृश्य वस्तुस्थितीचे अध्ययन करणे.
3) यात्रा व्यापार केंद्राच्या उत्पत्तीस्थानाविषयी संकल्पनेचे अध्ययन करणे.
4) बेंबळा खो–यातील यात्रा व्यापार केंद्राला परिणाम करणा–या घटकांचे अध्ययन करणे.

***संशोधन पध्दती :***

प्रस्तुत संशोधन लेखात यात्रा व्यापार केंद्रांच्या अध्ययनाकरीता लागणारी आकडेवारी व माहिती प्राथमिक व दुय्यम स्वरुपाची असून ही माहिती व आकडेवारी प्रत्यक्ष स्थळांना भेटी देऊन व प्रश्नावलीव्दारे गोळा करण्यात आली आहे.तसेच अमरावती, यवतमाळ व वाशिम जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, जिल्हा सांख्यिकी विभाग येथून गोळा करण्यात आलेली सांख्यिकीय माहिती व नकाशे या सर्व माहितीच्या आधारे बेंबळा खो–यातील यात्रा व्यापार केंद्रांच्या उत्पत्तीविषयी व इतर धार्मिक संकल्पनेचा आधार घेऊन मांडण्यात आली आहे.

***विषय विवेचन :***

***बेंबळा खो–याची यात्रासदृश्य वस्तुस्थिती :***

बेंबळा खो–यातील यात्राव्यापार केंद्रांची उत्पत्ती व विकासाची माहिती उपलब्ध असलेल्या संदर्भ माहितीनुसार व पध्दतीशास्त्राच्या अनुशंगाने मिळविण्याचा प्रयत्न केला आहे केंद्राच्या उत्पत्तीविषयी खालील माहितीवरुन काढलेली आहे.

1) अनुमान काढून रस्त्यांची मांडणी केलेली आहे.
2) शासकीय दप्तरी नोंद मार्ग
3) ब्रिटीशकालीन राजवटीत असलेले डाक मार्ग
4) शासकीय दप्तरी नोंद असलेले यात्रा व्यापार केंद्र.

बेंबळा खोरे
ब्रिटीश कालखंडातील यात्रा व्यापार स्थळाचे भौगोलीक वितरण




प्रस्तुत नकाशामध्ये यात्राव्यापार केंद्रामध्ये मसाळा, तळेगाव दषासर, धनज माणिकवाडा, मांगलादेवी, कामरगाव, अजंती, अंजनगाव बारी इ. यात्रांचा धार्मिक यात्रा म्हणून प्राचीन काळात उल्लेख आढळतो तर भिलटेक, घुईखेड, सावंगा विठोबा, वाढोणा रामनाथ व कारंजा इ. यात्रांचा ऐतिहासीक काळामध्ये उल्लेख दिसून येतो. या संपूर्ण केंद्राची स्थलबाधीत अंतरानुसार व लांब मार्गापर्यंत उत्पत्ती झाल्याचे आढळते. बेंबळा खो–याच्या उत्तरेला अमरावती, आग्नेयला यवतमाळ व पश्चिमेला अकोला जिल्हे सभोवताली असल्यामुळे मुख्यालयांना जाण्याकरीता ग्रामीण भागातून ब्रिटीश काळामध्ये जास्त रस्त्यांची दाटी आढळून येत नाही पण आज संपूर्ण खो–यात वाहतुकीचे जाळे सर्वदूर आढळतात. खो–यामध्ये कारंजा, नेर, चांदूररेल्वे, बाभुळगाव व नादंगाव खंडेश्वर या तालुक्याच्या ठिकाणी पोस्ट ऑफीस, पोलीस स्टेशन, डाकबंगला, विश्रामगृह व इतर वैद्यकिय सोयी आढळतात.

ब्रिटीशकालीन अवस्थेमध्ये बेंबळा खो–यातील यात्रा व्यापार केंद्र निरनिराळया रस्त्यांची अवस्था चांगली नव्हती. नंतर हळूहळू रस्त्यामध्ये सुधार होऊन प्रत्येक धार्मिक, पौराणिक व ऐतिहासीक यात्रा व्यापार केंद्र वेगवेगळया मार्गाने जोडल्या गेले त्यामुळे त्यातील काही केंद्र आज विकसीत अवस्थेमध्ये दिसतात.

बेंबळा खो–याच्या पूर्वेला वर्धा नदी खोरे असल्यामुळे, उत्तरेला डोंगराळ व जंगलयुक्त भाग असल्यामुळे वाहतुकीची सुगमता कमी दिसून येते. ब्रिटीश कालखंडात खो–याच्या मध्य भागात, पष्चिमेला व दक्षिणेला रस्त्यांची सुगमता जास्त असल्यामुळे या भागात धार्मिक, पौराणिक व ऐतिहासीक केंद्राची उत्पत्ती झालेली दिसून येते. या संपूर्ण यात्रा व्यापार केंद्रांची उत्पत्ती एकाच कालखंडात झालेली नसून विविध कालखंडात झालेली दिसून येते. भिलटेक, घुईखेड, सावंगा विठोबा, वाढोणा रामनाथ व कारंजा या ऐतिहासीक व मसाळा, तळेगाव दषासर, धनज माणिकवाडा, मांगलादेवी, कामरगाव, अजंती, अंजनगाव बारी या धार्मिक यात्रा व्यापार केंद्राची उत्पत्ती व त्यांचा विकास सुध्दा विविध घटकाव्दारे झालेला दिसून येतो. यात्रा व्यापार केंद्राच्या उत्पत्ती स्थानाविषयी इतर संकल्पना : यात्रा व्यापार केंद्राच्या मूळ अवस्थेबद्यल किंवा उत्पत्तीविषयी दिलेल्या सिध्दांतावरुन अभ्यास करणे पूर्ण होणार नाही याव्यतिरीक्त यात्रा व्यापार केंद्राच्या उत्पत्ती स्थानाविशयी इतर सकल्पनेचा अभ्यास करणे महत्वपूर्ण आहे.

**यात्रा व्यापार केंद्राच्या उत्पत्ती स्थानाविषयी इतर संकल्पनेचा आधार**

| अ.क्र. | प्रभावाखाली येणा–या यात्रा व्यापार केंद्राची एकूण संख्या | उत्पत्तीविषयी संकल्पनेचा आधार |
|---|---|---|
| 1 | 24 | थोर पुरुष व महात्म्यांचा आधार |
| 2 | 22 | वैष्णव, वारकरी यात्रा किंवा धार्मिक स्थळांचा आधार |
| 3 | 12 | स्त्री शक्तिशी संबंधीत आधार |
| 4 | 24 | पौराणिक व ऐतिहासीक आधार |
| 5 | 06 | पशुपक्षी व वृक्षांच्या अस्तित्वाचा आधार |
| 6 | 19 | ग्रामीण भागातील किंवा प्राकृतिक वैशिष्टयांचा आधार |
| एकूण | 107 | |

संदर्भ : क्षेत्रीय कार्य (2007–08)

***1) थोर पुरुष व महात्म्यांचा आधार :*** खो–यामध्ये अनेक संत, थोर पुरुष व महात्मे होऊन गेले त्याच आधारावर जवळजवळ 24 यात्रा व्यापार केंद्र भरतात. श्री. चक्रधर स्वामी, गुरु गोंविद प्रभु, भगवान महाविर, महम्मद पैगंबर व काही संत पुरुषाच्या जसे गजानन महाराज, अवधुत महाराज, संत लहानुजी, संत वामन महाराज व इतर थोर महात्म्यांचा आधार असलेले अनेक पुरावे आढळून येतात.

***2) वैष्णव, वारकरी यात्रा किंवा धार्मिक स्थळांचा आधार :*** महाराष्ट्रामध्ये दरवर्षी आषाढी एकादशीला पंढपूरच्या चंद्रभागेच्या तिरावर लाखो वारकरी एकत्र येतात. त्याचप्रमाणे हिंदु धर्मात अनेक धार्मिक विचार आहेत जसे महानुभाव पंथाचे अनुयायी रिध्दपूरला काशी असे म्हणतात तर बंजारा समाजातील लोक पोहरादेवी या ठिकाणाला बंजाराकाशी म्हणतात. बेंबळा खो–यातही 22 यात्रा व्यापार केंद्र हे धार्मिक व वारकरी पंथाच्या आधारावर आढळून येतात त्यापैकी कालांतराने 3 यात्रा केंद्र बंद पडली.

***3) स्त्री शक्तिशी संबंधीत आधार :*** भारतात अनेक ठिकाणी स्त्री शक्तीला उपास्य देवता मानुन दरवर्षी यात्रा भरते या ठिकाणांना शक्तीपीठे असे म्हणतात. महाराष्ट्रातही दरवर्षी रुख्मीणी देवीची यात्रा अमरावती व कौंडण्यपूरला भरते. स्त्री देवतेसमान मानून तिची पूजा संपूर्ण भारतात होत असते. अशा प्रकारे खो–यातही 12 यात्रा व्यापार केंद्र स्त्री शक्तीच्या आधारावर दिसून येते.

***4) पौराणिक व ऐतिहासीक आधार :*** या आधारावर एकूण 24 यात्रा व्यापार केंद्र आहेत, त्यापैकी 1 यात्रा केंद्र बंद पडले. याचे कारण पौराणिक काळापासून अर्वाचीन कालखंडापर्यत लोक वसाहती व धार्मिक कृत्य करीत असल्याचे पुरावे आढळून येतात. आजही अस्तित्वात असलेल्या काही मंदीरात महादेव मंदीरे, पुरातन देवीदेवतांची मंदीरे, बौध्दस्तुप व हेमाडपंथी मंदीरे पुरातन काळापासून आढळून येतात.

***5) पशुपक्षी व वृक्षांच्या अस्तित्वाचा आधार :*** पिंपळ वृक्षाला बौध्द धर्मात, सालई वृक्षाला जैन धर्मात पूज्य मानून दरवर्षी पूजेनिमीत्याने यात्रेचे स्वरुप येते. याशिवाय गाय, बैल, हत्ती, माकड, हरीण व घोडा इ. प्राणी, तसेच कोकीळ, पोपट, मोर या पक्षांची भारतीय संस्कृतीत पुजा केली जाते. शेतकरी बांधव दरवर्षी बैलाचा सन्मान म्हणुन पोळा सण साजरा करतात. नागपंचमीला नागाची पुजा होते. म्हणून यात्रा व्यापार केंद्राचे अस्तित्व व पावित्र्य टिकविण्यास पशुपक्षी व वृक्षांच्या अस्तित्वाचा आधार ही एक संकल्पना देखील प्रकर्षाने जाणवते. खो–यात गोमाताची, खंडोबाची, नागदेवतांची व वृक्षाची वैशिष्टयपूर्ण 6 यात्रा व्यापार केंद्र आढळून येतात.

***6) ग्रामीण भागातील किंवा प्राकृतिक वैशिष्टयांचा आधार :*** ग्रामीण भागातील जीवनशैली वैशिष्टयपूर्ण असल्यामुळे अनेक प्रथा, परंपरा, विचार प्रचलित झाले आहे. खेडयात अनेक ग्रामदेवतांच्या यात्रा संपन्न होतात. मेसकाई, खेकसाई, वाघाई, मसोबा, वाघोबा, मातामाय, मरामाय, यासारख्या अनेक ग्रामदेवता निर्माण झाल्या आहे. सूपिक गाळाच्या मैदानी प्रदेशात, नद्याच्या काठावर यात्रा व्यापार केंद्राची उत्पत्ती अधिक प्रमाणात असून डोंगराळ व दूर्गम भागात अल्प प्रमाणात यात्रा स्थळे दिसून येतात. अशा ठिकाणी यात्रेचे स्वरुप मर्यादीत असून यात्रेकरुचे प्रमाणही कमी आढळते. ग्रमीण भागातील व प्राकृतिक वैशिष्टयाच्या आधारावर एकूण 19 यात्रा व्यापार केंद्र असून 5 यात्रा केंद्र बंद पडून सध्या 14 यात्रा केंद्र अस्तित्वात आहे.

***बेंबळा खो–यातील यात्रा व्यापार केंद्रावर परिणाम करणारे घटक :***

1) खो–यामध्ये धार्मिक हेतु, वस्तुंची विक्री विनिमय, गुरांची विक्री, शेती प्रदर्शनी याबाबत नियोजन अयोग्य.
2) भौगोलीक प्रतिकुलता व धार्मिक उदासिनतेमुळे यात्रा व्यापार केंद्राना स्थैर्य लाभले नाही.
3) महाराष्ट्र सरकारने उच्च दर्जाच्या तीर्थस्थळांना  अनुदान सुविधा न दिल्यामुळे यात्रेकरुना निवासाची सोय न होणे.

4)बेंबळा खो–यातील यात्रा व्यापार केंद्राचे पावित्र्य राखण्यास शांतता व सुव्यवस्था ठेवणे, नैसर्गिक सौंदर्य टिकविण्याकरीतायात्रेकरुंमध्ये सलोखा व सुरक्षेच्या बाबीकडे लक्ष नसणे.
5) शासनाकडून बेंबळा खो–यातील मोठया यात्रा व्यापार केंद्रावर शेतक–यांच्या धान्याला व कारागिरांच्या वस्तुंना व मालाला विकण्याकरीता योग्य भाव मिळण्याकरीता अशा केंद्राची नोंद घेणे.
6) ज्या यात्रेचे आयोजन देवस्थाने, ट्रस्ट, संस्थानाकडे असेल पण तेथील यात्रांचे नियोजन योग्य करण्याकरीता स्थानिक संघटनानी लक्ष देणे आवश्यक आहे.
7) यात्रेव्दारे ग्रामीण भागातील जनतेला विविध विषयांचे ज्ञान अवगत होण्याकरीता इतर जाहीरातीप्रमाणेच शेतीच्या नाविण्यकरणाचे ज्ञान शेतक–यांना अवगत करणे. त्याचबरोबर आरोग्यविशयक ज्ञान, सरकारचे विकसीत ध्येयधोरणाबाबत प्रदर्शनीची कमतरता

*निष्कर्ष:*

1) पुरातन यात्रा व्यापार विनीयोग पध्दतीमध्ये बदल होऊन ती यात्रा व्यापार केंद्र एकमेकांसोबत उत्पादनाला पुरक बाहय विनीयोगामुळे चालतात. त्याच यात्रा व्यापार केंद्रांचा विकास झालेला दिसून येतो.
2) खो–यामध्ये दळणवळणांच्या साधनामध्ये आधुनिक काळात ज्या प्रमाणात वाढ झाली मार्गाच्या उपलब्धतेमुळे त्याप्रमाणात यात्रा व्यापार केंद्र विकसीत झालेले आढळून येतात.
3) बेंबळा खो–यातील यात्रा व्यापार केंद्रांची उत्पत्ती प्रामुख्याने धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक व प्राकृतिक वैशिष्टयांचा आधार घेऊन निर्माण झालेली आढळून येते.
4) शांतता, सलोखा व सुरक्षा हे घटक यात्रा व्यापार प्रणालीचा श्वास असून खो–यातील ज्या यात्रा केंद्रांमध्ये या स्वरुपाचे कार्य सुरळीतपणे चालू आहे त्या यात्रा व्यापार केंद्राचा विकास झालेला आढळून येतो.

*संदर्भ सूची :*

1.Gedam D.A. (1974) : 'A Geographical Analysis of Fairs at Salabardi', The Indian Geographical Journal, Vol. XLXIX, No.1, p.17-24.
2.Gedam D.A. (1986) : 'Periodic Marketing System & Network', Allied Associates, Nagpur
3.गेडाम दे. अ. (1992) : 'भातकुली तहसिलमधील यात्रा व्यापार स्थळांचे स्थल कालबाधित अंतर,' महाराष्ट्र भूगोलशास्त्र संशोधनपत्रिका, वर्ष 6 अंक : 2, डिसेंबर 1992, पा. 25–29.
4.नेगी जगमोहन (2001) : 'पर्यटन एंव यात्रा के सिंध्दात', तक्षशिला प्रकाशन, अन्सारी रोड, दरियागंज, नई दिल्ली.
5.कारंजकर भि. दे. (1978): अमरावती शहराचा इतिहास, अमरावती नगरपालिकेच्या शताब्दी महोत्सवानिमीत्त प्रकाशित
6.श्रीवास्तव व्ही. के. (1995): विपणन भूगोल एसोसिऍशन ऑफ मार्केटिंग ज्याग्राफर्स ऑफ इंण्डिया, गोरखपूर
7.शिंदे एस.बी. (2001): पर्यटन भूगोल, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
8.Smith R. H. (1971) : 'TheTheory of periodic Markets', consumer and traders behavior. Annual meeting of the Canadian association of Geographers.
9.Tamaskar B. G. (1977) : 'Periodic Marketing System in Medial Maharashtra', The Geographical Review of India, Calcutta, Vol. 3, N0. 2

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net